Rotary Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

साप्ताहिक

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

नोव्हेंबर - २०२५ | अकरावा अंक

Rotary ASHA EXPRESS
Women's Health on Wheels

## रोटरी आशा एक्सप्रेस विशेषांक






Rtn.Francesco Arezzo
RI President 2025-26



Rtn.Sudhir Lature
Dist.Governor 2025-26



Rtn.Amol Dadge
President



Rtn.Pawan Malpani
Secretary

## Guest Editor Rtn.Motilal Varma



प्रिय रोटेरियन बांधवांनो,

रोटरीचे प्रत्येक महिन्याचे विशेषत्व हे त्याच्या सेवेच्या केंद्रबिंदूमुळे ठरते. नोव्हेंबर हा महिना रोटरी इंटरनॅशनलमध्ये "Rotary Foundation Month" म्हणून साजरा केला जातो आणि त्यामुळे हा काळ आपल्याला रोटरीच्या सेवाभावाचे, त्यागाचे आणि उदात्त ध्येयाचे पुनःस्मरण करुन देतो.रोटरी फाउंडेशन म्हणजेच चे हृदय. जगभरातील लाखो रोटेरियनांच्या योगदानातून ही फाउंडेशन असंख्य सेवा प्रकल्पांना बळ देते शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, शांतता व मानवी कल्याणाच्या क्षेत्रात असंख्य कार्य आज या फाउंडेशनच्या माध्यमातून यशस्वीपणे घडत आहे.रोटरीचे खरे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सामूहिक शक्ती आणि निस्वार्थ सेवा वृत्ती. आपण सर्व रोटेरियन जेव्हा एकत्र येतो, तेव्हा आपण केवळ मदत करत नाही, तर समाजात परिवर्तनाची बीजे रोवतो. हाच या परिवर्तनाचा आधारस्तंभ आहे. प्रत्येक रोटेरियनने आपला थोडा वेळ, श्रम किंवा आर्थिक हातभार या कार्यासाठी दिला, तर आपण एक नव्या जगाच्या निर्मितीत आपला सहभाग नोंदवू शकतो.नोव्हेंबर महिना आपल्याला आत्मपरीक्षणाची संधीही देतो आपण गेल्या काही महिन्यांत समाजासाठी काय दिलं आणि पुढे काय देऊ शकतो, याचा विचार करण्याची. ''सेवा सर्वोपरि'' हा रोटरीचा मूलमंत्र फक्त घोषवाक्य नसून, तो जीवनशैली व्हावी हीच खरी रोटरीची भावना आहे.''रोटरी दिशा'' या बुलेटिनच्या माध्यमातून आपली कार्ये, विचार, आणि समाजोपयोगी प्रकल्प सर्व सदस्यांपर्यंत पोहोचतात. अतिथी संपादक म्हणून हा साप्ताहिक अंक साकारताना मला आनंद आणि अभिमान दोन्ही वाटतो. या मंचाद्वारे रोटरी परिवाराच्या सेवाभावाला दिशा देण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य समजतो.आपल्या सर्वांच्या सहकार्याने रोटरीचा प्रत्येक अंक अधिक अर्थपूर्ण, प्रेरणादायी आणि सकारात्मक ऊर्जेने परिपूर्ण होईल, असा मला विश्वास आहे.

रो.मोतीलाल वर्मा
अतिथी संपादक, रोटरी दिशा

## Secretary Report

- मिटींग ची सुरुवात राष्ट्रगीताने झाली
- फोरवे टेस्ट चे सामुहीक वाचन झाले.
- मिटींग क्र. १६ चे वाचन सचिव रो. गणेश सावंत यांनी केले.
- रोटरी रन : या उपक्रमाचे माहिती प्रोजेक्ट चेअरमन अमोल बनाळे यांनी दिली . दि. २६/१०/२०२५ रोजी रन होणार असल्याचे सांगितले. अधिकाधिक सदस्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन केले.
- पुरग्रस्तांना किटचे वाटप याबद्दल माहिती रो. मोतीलाल वर्मा यांनी दिली.
- अन्नपूर्णा योजना लाभार्थ्यांना ड्रेस व फराळ वाटप बाबत सविस्तर माहिती अन्नपूर्णा प्रोजेक्ट चेअरमन रो. शशिकांत मोरलावार यांनी दिली
- क्लब बुलेटिन : ची माहिती रो. प्रमोद जी कुंभार यांनी दिली अनावरण डिजी रो. सुधीर जी लातुरे , अध्यक्ष व सचिव व अतिथी संपादक रो. अनिल टाकळकर यांच्या हस्ते झाले
- रोटरी इन्फर्मेशन क्विज अतिशय रंजक पद्धतीने रो. सचिन मालु यांनी घेतली.
- फॅमिली मिटींग ची माहिती रो. अमोल बनाळे यांनी दिली.
- अन्नपूर्णा योजना लाभार्थी महिलांना साडी वाटप १ नोव्हेंबर रोजी होणार असल्याची माहिती रो. विशाल अयाचित यांनी दिली.
- माजी सदस्य राहुल झिंगाडे यांचे रोटरी रनचे टि शर्ट देऊन कौतुक करण्यात आले.
- डिजी रो. सुधीर लातूरे यांनी रोटरी रन २०२५ -२६ का घेत आहोत याबाबत सविस्तर माहिती दिली.
- फेलोशिप अनाउन्समेंट रो. गणेश सावंत यांनी केली

### Man of The Meeting



Rtn.Dr.Purushottam Darak

### 1st Come in the Hall



Rtn.Vishnudas Toshniwal

## रोटरी आशा एक्सप्रेस लातूर  एक आशेचा चालू प्रवास

कॅन्सर हा आजच्या काळातील सर्वात भीषण पण तितकाच उपचारक्षम आजार आहे. मात्र लवकर निदान न झाल्यामुळे अनेकांचा जीव या आजारामुळे जातो. ग्रामीण भागात अजूनही तपासणी, निदान आणि जनजागृतीचा अभाव असल्याने अनेक रुग्ण उशिरा उपचाराकडे वळतात. या सा'ाजिक वास्तवाची जाणीव ठेवून रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन यांनी एक प्रभावी व संवेदनशील उपक्रम हाती घेतला आहे  ''रोटरी आशा एक्सप्रेस.''ही संकल्पना म्हणजेच आशेचा प्रवास! कॅन्सरविरोधी लढ्यात जनतेपर्यंत निदानाची पहिली पायरी पोहोचवणारा हा प्रकल्प विवेकानंद मेडिकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर, लातूर यांच्या सहकार्याने आणि रोटरी क्लब ऑफ  लातूर मिड-टाऊन यांच्या सहाय्याने ग्लोबल ग्रँट अंतर्गत साकारला गेला आहे. या फिरत्या वैद्यकीय बसद्वारे ग्रामीण व शहरी भागात नियमित कॅन्सर तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. दर शिबिरात डॉक्टर, नर्सेस, तंत्रज्ञ व स्वयंसेवकांचा एक कुशल कार्यसंघ रुग्णांची तपासणी करतो, जनजागृती करतो आणि आवश्यक असल्यास पुढील उपचारासाठी रेफरल देतो. २७ जून ते १० ऑक्टोबर २०२५ या साडेतीन महिन्यांत ''रोटरी आशा एक्सप्रेस''ने गुबाळ, निदूर, औसा, अंबाजोगाई, टाकळी बर्दापूर आणि अंबाजोगाई (वसुधारा प्रतिष्ठान व रोटरी क्लब), बोधे नगर लातूर, मुरुड, तिवटनगर ता. चाकुर, भांतगळी, कळंब  अशा अकरा ठिकाणी कॅम्प घेतले. या शिबिरांमधून एकूण तब्बल १०९५ रुग्णांची तपासणी करण्यात आली, त्यापैकी ६६४ महिला (६१%) आणि ४३१ पुरुष (३९%) होते. यामध्ये ८२ रुग्णांची कॉलोस्कोपी आणि २९५ रुग्णांचे थर्मल स्क्रीनिंग करण्यात आले.या सर्व कॅम्प्समधून काही महत्त्वाची निरीक्षणे समोर आली महिलांचा सहभाग उल्लेखनीयरीत्या जास्त होता, म्हणजे महिलांमध्ये जागरुकतेचा पातळी वाढताना दिसतोय. प्रत्येक शिबिरात सरासरी १०० रुग्णांची तपासणी झाली, आणि रेफरल रुग्णांची संख्या वाढल्याने वेळेवर उपचाराची संधी अधिक रुग्णांना मिळणार आहे. लवकर निदान आणि जनजागृतीवर भर दिल्याने लोकांमध्ये कॅन्सरविषयीची भीती कमी होत आहे आणि आत्मविश्वास वाढत आहे. या उपक्रमाचा पुढील टप्पा म्हणून रोटरी क्लब ऑफ  लातूर मिडटाऊन मार्फत बुद्ध गार्डन, कॉइल नगर, लातूर (१ नोव्हेंबर २०२५) आणि रोटरी क्लब ऑफ उमरगा मार्फत उमरगा येथे (१५ नोव्हेंबर २०२५) येथे शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. ''रोटरी आशा एक्सप्रेस''चा हा प्रवास म्हणजे आशेचा प्रवास  प्रत्येक घरापर्यंत आरोग्य, जागरूकता आणि नवजीवनाचा संदेश पोहोचवणारा.लातूर व परिसरातील सर्व रोटरी क्लबना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे, जेणेकरून हा सेवाप्रकल्प अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल आणि कॅन्सरविरुद्धची ही चळवळ अधिक बळकट होईल.शेवटी, ''रोटरी आशा एक्सप्रेस'' हे फक्त एक रुग्णवाहिका नाही, तर ती आशेचा प्रवास, संवेदनशीलतेचे प्रतीक आणि सेवेचा जिवंत संदेश आहे.कारण एकत्र आलो तरच कॅन्सरवर विजय मिळवू शकतो!

रोटरी  सेवा हीच खरी ओळख!


**संपर्क**

**रो.रविंद्र बनकर**

मो.721960304


## अभिनंदन



रो.रविंद्र बनकर
यांची रोटरी वर्ष
२०२६-२७ साठी
डिस्ट्रीक्ट डायरेक्टर
द रोटरी फाउंडेशन
पदी निवड



रो.प्रा.डॉ.राजाराम दावणकर
यांना जेजुरी येथे
राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार
प्रदानकरण्यात आला.

## रोटरी रन २०२५ क्षणचित्रे







# Rotary Mid Town this Week  Photo Gallery






## प्रकल्प





रो.विशाल आयाचित यांच्या मातोश्रींच्या स्मरणार्थ अन्नपूर्णा लाभार्थी महिलांना साड्यांचे वाटप







बुद्ध गार्डन येथे महिलांचे मोफत कर्करोग व नेत्र तपासणी शिबीर


75177 55567

www.pestedge.in

"वाळवी" या घातक किटकापासून ३० -४० वर्षापर्यंत इमारतीचे संरक्षण करण्याकरिता

वाळवीमुळे होणारे नुकसान







वाळवी प्रतिबंधक उपचार







PESTEDGE®
EnviroCare's

चे अद्यावत, नाविन्यपूर्ण व प्रभावी तंत्रज्ञान

**Anti Termite Reticulation Pipe Network**

**Termite Control Treatment "Under The Floor"**
(इमारतीच्या Basement मध्ये किंवा टाईल्स (फरशी ) बसवण्यापूर्वी स्थापित करणे आवश्यक)

स्थापित करा व निश्चिंत व्हा.

**Simple | Smart | Superb**
**Termite Protection Solution**

PestEDGE EnviroCare's
A Flagship Brand of
Neatedgee Services Pvt Ltd